**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राजस्थान आणि गुजरातच्या दौऱ्यावर/ विविध विकासकामांचं करणार लोकार्पण आणि पायाभरणी

- भारताच्या विकास यात्रेत फ्रेंच उद्योग आणि गुंतवणूकदारांनी सहभागी व्हावं असं केंद्रीय अर्थमंत्र्यांचं आवाहन

- मुंबईतल्या हाफकिन संस्थेचं खासगीकरण करणार नसल्याचं राज्यसरकारचं विधानसभेत स्पष्टीकरण

**आणि**

- व्हेनेझुएलात भूकंपामुळे मरण पावलेल्यांची संख्या अडीच हजाराच्यावर

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या राजस्थान आणि गुजरातच्या दौऱ्यावर जाणार आहेत. राजस्थानात जोधपुर इथं ते विमानतळाच्या नवीन इमारतीचं उद्घाटन करतील. ४८० कोटी रुपये खर्चून उभारलेल्या या विमानतळाची वार्षिक प्रवासी क्षमता २० लाख इतकी आहे. सुधारित उडान योजनेचं उद्घाटनही प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होईल. त्याखेरीज बालोत्रा इथं एक लाख सहा हजार कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी ते करतील. पाचपदरा इथं ग्रीनफील्ड एकात्मिक तेलशुद्धिकरण आणि पेट्रोकेमिकल्स संकुलाचं लोकार्पण, जयपूर मेट्रो च्या दुसऱ्या टप्प्याची पायाभरणी, यांचा त्यात समावेश आहे. राजस्थान सरकारमधे नोकरी मिळालेल्या ५४ हजार युवकांना प्रधानमंत्र्यांच्या हस्ते नियुक्तीपत्राचं वाटप होईल.

गुजरातमधे सीजी सेमीकंडक्टर असेंबलिंग आणि चाचणी कारखान्याचं उद्घाटन प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार आहे. देशाच्या सेमीकंडक्टर अभियानातल्या पहिल्या ४ कारखान्यांपैकी एक गुजरातमधे साणंद इथं साडेसातहजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून उभा राहणार आहे.

**<><><><><>**

भारत आणि फ्रान्स दरम्यानचा व्यापार गेल्या दशकभरात दुप्पट झाला असून विकसित भारत २०४७च्या दिशेने सुरू असलेल्या भारताच्या प्रवासात फ्रेंच उद्योग आणि गुंतवणूकदारांनी सहभागी व्हावं असं आवाहन अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केलं. पॅरिस इथं आयोजित भारत-फ्रान्स व्यापार गोलमेज परिषदेला त्या संबोधित करत होत्या.

शाश्वत, लवचीक आणि नाविन्यपूर्ण विकासाच्या पुढच्या टप्प्याला चालना देण्यासाठी भारत-फ्रान्स धोरणात्मक भागीदारी सज्ज असल्याचं प्रतिपादनही त्यांनी केलं.

<><><><><>

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी जम्मू आणि काश्मीरमधून अमरनाथची यात्रा सुरु करत असलेल्या भाविकांना शुभेच्छा दिल्या आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अमरनाथ यात्रा करत असलेल्या भाविकांना शुभेच्छा दिल्या आहेत. यात्रेरदरम्यान स्वच्छता राखणं, प्रशासनाच्या सर्व दिशानिर्देशांचं पालन करणं, व्होकल फॉर लोकल अंतर्गत स्थानिक उत्पादनं खरेदी करण्याला प्राधान्य देणं, एक पेड माँ के नाम अभियानाला चालना देणं आणि विकसित भारत दृष्टीकोनात योगदान देणं, हे पाच संकल्प करण्याचं आवाहन त्यांनी यात्रेकरुंना केलं आहे.

<><><><><>

जपानच्या प्रधानमंत्री साने ताकाईची भारताचा दौरा आटोपून मायदेशी परतल्या. केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंह यांनी त्यांना विमानतळावर निरोप दिला. जपानी प्रधानमंत्र्यांनी आपल्या भारतभेटी दरम्यान नवी दिल्लीत झालेल्या १६व्या भारत-जपान वार्षिक संमेलनात भाग घेतला. या भेटीत दोन्ही देशांनी  परस्परांच्या विकास आणि समृद्धीसाठी महत्त्वपूर्ण असलेल्या भागीदारीला आणखी दृढ करण्याच्या वचनबद्धतेवर भर दिल्याचं, परराष्ट्र मंत्रालयानं समाज माध्यमवरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

युवा व्यवहार मंत्रालयानं आज नवी दिल्लीत माय भारत उद्योग संघटना परिषद आयोजित केली आहे. असोचॅम, फिक्की, सीएआयटी आणि सीआयआय यासारख्या अग्रगण्य उद्योग संघटना या परिषदेत सहभागी झाल्या आहेत.

उद्योग क्षेत्र आणि 'माय भारत' यांच्यातल्या सहकार्यामुळे युवकांची ऊर्जा राष्ट्रीय विकास उद्दिष्टांकडे प्रभावीपणे वळवता येईल, असं केंद्रीय युवा कार्य आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविय यांनी या कार्यक्रमात बोलताना सांगितलं.

विविध उद्योग आणि उद्योग संघटना सध्या युवक क्षेत्रात कोणत्या प्रकारे कार्यरत आहेत, याचा आढावा या बैठकीत घेतला जाणार आहे, असं युवा कार्य आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं. या परिषदेच्या उद्दिष्टांबद्दल बोलताना त्या म्हणाल्या…

**—- होल्ड—- बाईट—- रक्षा खडसे - -**

**<><><><><>**

मध्यप्रदेशातल्या काही गोरक्षक म्हणवणाऱ्या ७ हल्लेखोरांना शिक्षा सुनावणाऱ्या न्यायाधीशांना धमक्या मिळाल्याच्या प्रकरणाची मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने स्वतःहून दखल घेतली आहे. गायीची कथित तस्करी करणाऱ्या एका व्यक्तीला काही गोरक्षक म्हणवणाऱ्या व्यक्तींनी सामूहिक हल्ला करून मारल्याप्रकरणी २०२२ साली नर्मदापूरम जिल्ह्याच्या सत्र न्यायाधीशांनी शिक्षा सुनावली होती.

नि:पक्षपाती न्यायदान करणाऱ्या न्यायाधीशांना अशा धमक्या मिळाल्यामुळे न्यायालयाचं स्वातंत्र्य आणि निर्भयतेनं न्यायदान करण्याच्या क्षमतेला बाधा येत असल्याचं मत उच्च न्यायालयानं व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

मुंबईतल्या हाफकिन संस्थेचं कुठल्याही प्रकारे खासगीकरण करणार नसल्याचं सरकारने आज विधानसभेत स्पष्ट केलं. या संस्थेची जबाबदारी सनदी अधिकारी तुकाराम मुंढे यांच्याकडे देऊ अशी घोषणा अन्न आणि औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी केली.

स्टिंग या एनर्जी ड्रिंकमध्ये काही घातक रसायनं आढळून आली आहेत, जी लहान मुलांसाठी योग्य नाहीत, त्यामुळे शाळेच्या ५०० मीटर परिसरात त्याच्या विक्रीवर बंदी घालण्यात येईल, अशी घोषणाही झिरवाळ यांनी दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरात केली.

भटक्या कुत्र्यांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांचं काटेकोर पालन होईल असं आश्वासन सरकारने आज विधानसभेत दिलं. मुंबईत या

कुत्र्यांसाठी ६ महिन्यात निवारा तयार करू. असं प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी सांगितलं. राज्यात १४ लाख ८० हजाराहून अधिक भटके कुत्रे आहेत. त्यातले ९४ हजार मुंबईत आहेत. राज्यातल्या २ लाखाहून अधिक भटक्या कुत्र्यांचं लसीकरण आणि १ लाख ८० हजाराहून अधिक कुत्र्यांचं निर्बीजीकरण झाल्याची माहिती त्यांनी दिली.

मुंबईत मनोरी इथं समुद्राचं खारं पाणी गोडं करण्याचा २० कोटी लीटर क्षमतेचा प्रकल्प उभारण्याचं काम डिसेंबरमध्ये सुरू झालं आहे. ४ वर्षात हा प्रकल्प पूर्ण करण्याचं नियोजन असून त्यानंतर मुंबईतल्या पाणी पुरवठ्याची समस्या कमी व्हायला मदत होईल असं प्रभारी मंत्री उदय सामंत यांनी सांगितलं.

<><><><><>

सन २०२३ ते मे २०२६ या कालावधीत मुंबई शहर आणि उपनगरात रेल्वेशी संबंधित अपघातांमध्ये ५ हजार ९२७ जण मृत्युमुखी पडले, तर या कालावधीत रेल्वे प्रवासादरम्यान किरकोळ वादातून १७१ दखलपात्र गुन्हे नोंदवले आहेत, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानपरिषदेत लेखी निवेदनाद्वारे दिली. मयंक लोहार खून प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर रेल्वे स्थानकांवर गस्त वाढवण्याच्या आणि प्रवाशांच्या तपासणीची मोहीम आणखी तीव्र करायच्या सूचना दिल्याचं निवेदनात सांगितलं आहे.

१ एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या सहा महिन्यांत राज्य महिला आयोगाकडे महिला अत्याचाराच्या १६ हजार ६०८ तक्रारी दाखल झाल्या असून त्यापैकी २ हजार ७७७ तक्रारी प्रलंबित आहेत, अशी माहिती महिला आणि बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानपरिषदेत लेखी उत्तराद्वारे दिली.

<><><><><>

महाराष्ट्रात माहिती अधिकार कायद्यातल्या बदलांना स्थगिती देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे आणि राज्यातल्या माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी कायद्यातील बदल मागे घेण्याची मागणी केली होती. या मागणीसाठी पाच जुलैपासून आंदोलनाचा इशारा अण्णा हजारे यांनी दिला होता, त्यानंतर काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या संदर्भात माहिती आयोगाला पत्र पाठवलं.

<><><><><>

व्हेनेझुएलाला २४ जूनला बसलेल्या भूकंपाच्या दोन धक्क्यांमुळे मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांच्या संख्येनं अडीच हजाराचा टप्पा ओलांडला आहे. हंगामी राष्ट्राध्यक्ष डेलसी रॉड्रिग्ज यांनी सात दिवसांचा राष्ट्रीय दुखवटा जाहीर केला आहे. या दुर्घटनेत १२ हजार जण जखमी झाले असून १८९ इमारती उद्ध्वस्त झाल्या आहेत. सुमारे १० हजार नागरिक बेपत्ता असल्याची भीतीही अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

<><><><><>

मुंबई शहर आणि उपनगरात  सलग चौथ्या दिवशी पावसाची संततधार सुरू आहे. सकाळपासून जोरदार कोसळणाऱ्या पावसामुळे सखल भागात काही ठिकाणी पाणी साचलं आहे. रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवर काही ठिकाणी परिणाम झाला आहे.

हवामान विभागानं पुढचे ३ दिवस ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. त्यामुळे मुंबई महापालिकेनं आपली यंत्रणा सज्ज ठेवली आहे. गेल्या २४ तासांत मुंबईतल्या काही भागांत १५० मिमीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे.

<><><><><>

भारतीय क्रिकेट संघ पुढच्या महिन्यात श्रीलंकेच्या दौऱ्यावर जाणार आहे.  १५ ते २७ ऑगस्ट दरम्यान दोन कसोटी सामने होतील.  ही मालिका आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद 2025-27' या स्पर्धेचा भाग आहे. शुभमन गिलच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ खेळेल. जागतिक कसोटी क्रिकेट अजिंक्यपद गुणतालिकेत भारत पाचव्या स्थानावर आहे.

<><><><><>

आयसीसी महिला टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषकाची अंतिम लढत इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात रविवारी ऐतिहासिक लॉर्ड्स क्रिकेट मैदानावर होणार आहे. लंडनमध्ये काल झालेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात, यजमान इंग्लंडनं दक्षिण आफ्रिकेचा ४० धावांनी पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

<><><><><>

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत काल कॅलिफोर्नियात झालेल्या 'राऊंड ऑफ 32' च्या सामन्यात स्पेननं ऑस्ट्रियाचा 3-0 असा पराभव करून 'राऊंड ऑफ 16' मध्ये धडक मारली. आता स्पेनचा सामना पोर्तुगाल किंवा क्रोएशियाशी होईल.

//<><><><><>//